| MHKO190007652019 | दाखल दिनांक | :- | ०२/१२/२०१९ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :- | ०२/१२/२०१९ |
| | निकाल दिनांक | :- | १८/०५/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस, |
| | | | ०६ ०५ १६ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी आर.डि.शिंदे)

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १८ मे, २०२६**

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२८६/२०१९)** **(नि.क्र.२२/ब खाली)**

गुन्हा नोंद क्र.१०३/२०१९, पोलीस ठाणे राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, राधानगरी |
| अभियोग पक्षातर्फे | | विशेष सरकारी वकील श्री. के. एम. भोसले |
| आरोपी | | **अमोल बाळासो आडके**<br>वय वर्ष –३५, व्यवसाय – व्यापार,<br>रा.राधानगरी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | ॲड.श्री.ए. एस. हुपरीकर |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १२/०३/२०१९ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २२/०५/२०१९ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०२/१२/२०१९ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २२/०६/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १३/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १८/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १८/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. आरोपी निर्दोषमुक्त. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमोल बाळासो आडके | ०२/१२/२०१९ | ०२/१२/२०१९ | भा.द.वि.कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.का. कलम १८४, १३४(अ)(ब) अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य
## (पारीत दिनांकः१८/०५/२०२६)

भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब) अन्वये आरोपीवर संपरीक्षा चालविण्यात येत आहे.

## अभियोग पक्षाची हकीकत खालीलप्रमाणे:–

२. दिनांक १२/०३/२०१९ रोजी ०३.३० वाजताचे सुमारास फिर्यादी संतोष आनंदा पाटील हे शेतामध्ये काम करत होते. त्यावेळी त्यांचा पुतण्या सुशांत याने त्यांना मोबाईलवर फोन करुन असे सांगीतले की, मुलगा रुद्र हा रोडवर खेळत असताना कोणत्यातरी अज्ञात वाहणाने त्याला धडक देवुन जखमी केल्याने रुद्र यास उपचाराकरीता सोळांकूर येथील दवाखान्यामध्ये घेवुन जात आहे व तुम्ही सोळांकूर येथे या. त्यामुळे फिर्यादी व त्यांची पत्नी यांनी सोळांकूर येथील दवाखान्यामध्ये जावून रुद्र यास पाहीले असता त्यांना रुद्र याच्या दोन्ही पायाचे जांघेत गंभीर जखम झाल्याचे दिसुन आले. त्यावेळी सोळांकूर येथील डॉक्टरांनी रुद्र याचेवर प्राथमिक उपचार करुन त्याला सी.पी.आर हॉस्पीटल कोल्हापूर येथे घेवुन जाणेस सांगीतले. त्यामुळे फिर्यादी यांनी रुद्र यास ॲम्ब्युलन्सने सी.पी.आर हॉस्पीटल कोल्हापूर येथे दाखल केले. तेथे त्याचेवर ऑपरेशन करुन औषधोपचार करण्यात आला. त्यानंतर दिनांक १८/०३/२०१९ रोजी रुद्र यास पुढील उपचारासाठी के.पी.सी हॉस्पीटल कोल्हापूर येथे दाखल केले होते. तेथे त्याचेवर पुढील औषधोपचार करुन दिनांक २०/०३/२०१९ रोजी त्याचे दुसरे ऑपरेशन व दिनांक २३/०३/२०१९ रोजी तिसरे ऑपरेशन करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीमध्ये फिर्यादी यांना असे समजले की, आरोपी याने त्याच्या ताब्यातील कार क्र.एम.एच.०४.डि.जे.२२१९ या वाहणाने रुद्र यास पाठीमागुन जोराने ठोकर देवुन त्याचा अपघात केला. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपी विरुध्द पोलीस ठाणेमध्ये फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीवरुन पोलीस ठाणे राधानगरी येथे आरोपी विरूद्ध गुन्हा क्र.१०३/२०१९ भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.का.कलम १८४,

१३४(अ)(ब) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीअंमलदार यांनी गुन्हयाचा तपास पुर्ण करुन आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी विरूध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.कलम १८४, १३४(अ)(ब) प्रमाणे नि.क्र.७ कडे गुन्हयाचा तपशिल नोंदविला व आरोपीस त्याचे विरुद्ध असलेल्या गुन्हयाचा तपशिल समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली.

५. आरोपी विरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी संतोष पाटील (अ.सा.क्र.१) याची साक्ष नि.क्र.१३ कडे, सुशांत पाटील (अ.सा.क्र.२) याची साक्ष नि.क्र.१४ कडे व महेश पाटील (अ.सा.क्र.३) याची साक्ष नि.क्र.१५ कडे नोंदविली. विशेष सरकारी वकील यांनी नि.क्र.२१ कडे पुरसीस देवुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या वर नमुद साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यात आरोपी विरुध्द आरोप सदृश्य कथने न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार चे निवेदन नि.क्र.१ वर आदेश करुन माफ करण्यात आले.

६. अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी वकील व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तीवाद ऐकला.

७. प्रस्तुत प्रकरणात खाली नमुद विचाराधीन प्रश्न माझे विचारासाठी पुढे आलेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष मी खाली नमुद कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १२/०३/२०१९ रोजी ०३.३० वाजताचे दरम्यान ऐनी–सरवडे रोडवर, पंडेवाडी, ता. राधानगरी येथील | |

| | | |
|---|---|---|
| | सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र.एम.एच.०४.डि.जी.२२१९ हे वाहन मानवी जिवीतास धोका पोहोचेल अगर अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे अथवा हयगयीने चालविले व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| २. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र.एम.एच.०४.डि.जी.२२१९ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन जखमी रुद्र यास पाठीमागुन जोराची ठोकर देवुन त्याचा अपघात करुन त्यास दुखापत पोहचविली व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३३७ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र.एम.एच.०४.डि.जी.२२१९ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन जखमी रुद्र यास पाठीमागुन जोराची ठोकर देवुन त्यास गंभीर दुखापत पोहचविली व त्यान्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र.एम.एच.०४.डि.जी.२२१९ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे व धोकादायकरितीने चालविले व त्यान्वये मोटर वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोगपक्ष सिध्द करतो | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | काय? | |
| ५. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र.एम.एच.०४.डि.जी.२२१९ हे वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे अथवा हयगयीने चालवुन अपघात केला व सदर अपघाताची माहीती नजीकच्या पोलीस ठाणेत न देता तेथुन निघुन गेला व त्यान्वये मोटर वाहन अधिनियम कलम १३४(अ)(ब) अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

८. आरोपीतर्फे प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१६, अपघातातील वाहणांचा तपासणी अहवाल नि.क्र.१७ व १८, जखमीची वैद्यकिय प्रमाणपत्रे नि.क्र.१९ व २० अशी कागदपत्रे मान्य केली आहेत.

## **का र ण मि मां सा**

**विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ बाबत**:-

९. विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ एकमेकांशी सुसंगत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदवित आहे.

१०. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी (अ.सा.क्र.१), सुशांत (अ.सा.क्र.२) व महेश (अ.सा.क्र.३) हे अनुक्रमे जखमीचे वडील व जवळचे नातेवाईक आहेत. परंतु असे असुन देखील सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. विशेष सरकारी वकील यांनी परवानगीनंतर सदर साक्षीदारांना उत्तरसुचक प्रश्न

विचारले असता त्यांनी असे कथन केले की, त्यांना अपघातामधील कार कोण चालवित होते हे माहीत नाही. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले की, त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहीली नसल्यामुळे अपघातात कोणाची चुकी होती हे त्यांना सांगता येणार नाही. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या उपरोक्त तीनही साक्षीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहाय्य केले नसल्याने विशेष सरकारी अभियोक्ता यांनी पुरसीस नि.क्र.२१ दाखल करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाने दाखल केलेल्या पुराव्यावरुन घटनेच्या वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील कार क्र.एम.एच.०४.डि.जे.२२१९ हे वाहन बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवुन जखमी रुद्र यास पाठीमागुन ठोकर देवुन त्यास साध्या व गंभीर दुखापती पोहचविल्या व अपघाताबाबत नजीकच्या पोलीस ठाणेमध्ये कोणतीही माहीती न देता घटनास्थळावरुन निघुन गेला याबाबी शाबीत होत नाहीत. परिणामी, आरोपी विरुध्द भा.दं.वि. चे कलम २७९, ३३७, ३३८ व मो.वा.कलम १८४, १३४(अ)(ब) प्रमाणे असलेले आरोप पुराव्याअभावी शाबीत होत नाहीत. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन प्रश्न क्र.६ बाबत**:-

११. वर नमुद सर्व चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ६ चे निष्कर्ष लक्षात घेता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## **- आ दे श -**

१. आरोपी अमोल बाळासो आडके यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) प्रमाणे भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटर वाहन अधिनियम कलम १८४, १३४(अ)(ब) नुसार शिक्षापात्र गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) च्या तरतुदींचे अनुपालन करावे व त्यानुसार रक्कम रु.१५,०००/– चा वैयक्तिक व जमानत मुचलका निष्पादित करुन द्यावा.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)*

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.05.18 17:34:42 +0530

ठिकाण : राधानगरी **(आर. डि. शिंदे )**
दिनांक :१८/०५/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
राधानगरी

**भाग–क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**१) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी–**

**अ. अभियोग पक्ष साक्षीदारांची यादी**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | संतोष आनंदा पाटील | फिर्यादी | १३ |
| २. | सुशांत जयसिंग पाटील | साक्षीदार | १४ |
| ३. | महेश बळवंत पाटील | साक्षीदार | १५ |

**ब. बचाव पक्ष साक्षीदारांची यादी– निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी– निरंक**

**२) अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)–**

**अ. अभियोग पक्ष निशाणी–निरंक**

**ब. बचाव पक्ष निशाणी– निरंक**

**क. न्यायालयातर्फे निशाणी–**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ७ | आरोपीचे निवेदन |
| ३. | १६ | गुन्हा घडले ठिकाणचा पंचनामा |
| ४. | १७ | स्वीप्ट कार तपासणी बाबतचा पंचनामा. |
| ५. | १८ | सायकल तपासणीचा पंचनामा. |
| ६. | १९ | के.पी.सी. हॉस्पीटल यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र. |
| ७. | २० | सी.पी.आर. हॉस्पीटल यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र |

**ड. सामग्री वस्तू –** निरंक